# Details on Website
# वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई

**मंत्रालयीन सेवेतून निवृत्त झालेल्या सहायक कक्ष अधिकारी यांची करार पध्दतीने नियुक्ती करण्याबाबत**

**विभागाची आवश्यकता :**

विभागातील अर्थसंकल्पीय कामकाजाचा किमान ३ वर्षाचा अनुभव असलेल्या सेवानिवृत्त सहायक कक्ष अधिकारी यांची माहे एप्रिल २०२६ पर्यंत वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई येथे करार पध्दतीने नियुक्ती करावयाची आहे.

अटी व शर्ती :-

१) उमेदवारास मराठी व इंग्रजी भाषेचे ज्ञान असावे.

२) राज्याचा अर्थसंकल्प तयार करणे, पूरक मागण्या व अर्थसंकल्पीय कामाचा अनुभव आवश्यक.

३) उमेदवार मंत्रालयीन सेवेतून निवृत्त झालेला असावा.

४) उमेदवाराचे वय ६५ वर्षापेक्षा अधिक नसावे.

५) उमेदवार मुंबई अथवा लगतच्या जिल्ह्यात राहणारा असावा.

६) आवश्यक अर्हता धारणा करणाऱ्या मंत्रालीयन सेवेतून निवृत्त झालेल्या इच्छुक सेवानिवृत्त सहायक कक्ष अधिकारी यांनी सदर पदाकरिता विहित नमुन्यात अर्ज सादर करावा.

७) उमेदवाराने त्यांचा अर्ज वेबसाईट वरील जाहीरात पाहून adm1.fd@maharashtra.gov.in या ई-मेल आयडीवर दिनांक २६.०२.२०२६ पर्यंत सादर करावा. या संदर्भात अधिक माहितीसाठी ०२२-२२८२६८११ या दूरध्वनीवर संपर्क साधावा. विहित मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जावर कार्यवाही करण्यात येणार नाही तसेच या संदर्भातील कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही.

८) विभागास आवश्यक असलेली अर्हता व अनुभव नसलेल्या सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांनी अर्ज सादर केल्यास अशा अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. तसेच अशा अर्जासंदर्भात शासनाशी केलेल्या पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही. तसेच अशा अर्जांना उत्तर देण्यात येणार नाही.

९) मुलाखतीद्वारे पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल. उमेदवार निवडीबाबतचा संपूर्ण अधिकार विभागाचा राहील.

१०) करार पध्दतीने नियुक्त सहायक कक्ष अधिकारी यांना वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई येथे काम करावे लागेल.

११) करार पध्दतीच्या नियुक्तीवरील कालावधीत सेवानिवृत्त सहायक कक्ष अधिकारी हे संबंधित सह सचिव/ उप सचिव यांच्या नियंत्रणाखाली काम करतील.

१२) इतर अटी व शर्ती सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १०.०६.२०२५ च्या शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे राहतील.

--x--

# अर्जाचा नमुना

## सेवानिवृत्त सहायक कक्ष अधिकारी यांची करार पध्दतीने नियुक्तीकरण्याकरिता अर्ज

| |
|---|
| उमेदवाराने अलीकडील काळातील स्वत:चे छायाचित्र येथे चिकटवावे |

१) अर्जदाराचे संपूर्ण नांव :-.........................................................................

२) अर्जदाराचा पत्ता :-.........................................................................

३) सेवानिवृत्तीच्या वेळचे पदनाम :-.........................................................................

४) भ्रमणध्वनी क्रमांक :-.........................................................................

५) जन्म दिनांक व वय :-.........................................................................

६) मूळ निवृत्तिवेतन :-.........................................................................
(PPO ची प्रत सोबत जोडावी)

७) विभागास आवश्यक अर्हता अर्जदाराकडे आहे काय? :- होय/नाही

८) अनुभव :-.........................................................................

९) वित्त विभागाच्या संकेतस्थळावर दि. रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहीरातीच्या अनुषंगाने सहायक कक्ष अधिकारी या पदासाठी मी काम करण्यास इच्छुक असून जाहीरातीतील /सूचनेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

**ठिकाण :-**

**दिनांक :-**

**अर्जदाराची स्वाक्षरी**